
ePaper
# मुंबईतील बोट दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू, तर मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत

|| वर्ष - 8 | अंक -160 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 19 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews





'ईव्हीएम' बदनाम हुई.. 'बिघाडी' तेरे लिये !

विशेष संपादकीय पान 4 वर

## महाराष्ट्रात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील का?

# भेटी मागे दडलंय काय!

### राजकीय चर्चेला उधाण: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शरद पवारांनी घेतली दिल्लीमध्ये भेट!

| मुंबई | महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू असताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे बुधवारी दिल्लीमध्ये माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी संसद होणार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली ही भेट राजकीय नसल्याचे सांगत असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र येण्याची जी चर्चा शरद पवार यांच्या वाढदिवसाच्या दिवशी सुरू झाली आहे त्या दृष्टीने शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांची भेट महत्वपूर्ण ठरेल का याची चर्चा चांगली सुरू झाली आहे.**





दिल्लीमध्ये माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी बुधवारी संसद भवनामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली शरद पवार यांनी त्यांची ही भेट राजकीय नसल्याचे सांगितले आहे शेतीच्या विषयाशी संबंधित ही भेट होती पण सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर नवीन समीकरण जुळतील असे चित्र दिसू लागले आहे 12 डिसेंबरला शरद पवार यांच्या वाढदिवसा दिवशी त्यांनी वयाच्या 85 व्या वर्षात पदार्पण केले त्यानंतर त्यांच्यापासून दुरावलेले त्यांचे पुतणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी सहकुटुंब शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी जाऊन भेट घेतली त्यांना शुभेच्छा दिल्या तेव्हापासूनच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र यावं अशी चर्चा सुरू झाली म्हणूनच आजची शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट महत्वपूर्ण ठरत आहे. शरद पवार आज पंतप्रधान मोदी यांना भेटले त्यावेळी सातारा आणि फलटणचे दोन डाळींब उत्पादक शेतकरी त्यांच्यासोबत होते या भेटीदरम्यान शेतकऱ्यांशी संबंधित प्रश्नावर त्यांनी पंतप्रधान मोदींसोबत चर्चा केली पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत शेतकऱ्यांच्या डाळिंब पिकाशी संबंधित ही भेट होती असे पवारांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही पवारांनी त्यांना भेट म्हणून डाळिंब या भेटीतून कुठलाही राजकीय अर्थ निघू नये म्हणून ही भेट फक्त पाच मिनिटांचीच होती असे देखील शरद पवार म्हणाले'.

### 'याला भेट, त्याला भेट दुसऱ्या दिवशी घरी थेट' ...

एकीकडे दिल्लीच्या थंडीमध्ये शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर राजकीय वातावरण गरम झालेले असताना,आदल्या दिवशी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांना शुभेच्छा दिल्या त्यानंतर त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची ही भेट घेतली. या भेटीवरून देखील राजकीय चर्चांना उधान आले आहे. ही भेट सदिच्छा भेट असल्याचे शिवसेनेकडून स्पष्ट करण्यात आले असले तरी देखील यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाष्य केले आहे. शिंदे म्हणाले, यांची कारस्थाने जगजाहीर आहेत. नुकत्याच लोकसभा निवडणुकीत त्यांना जे यश मिळाले. त्याने ते हुरळून गेले. मात्र विधानसभा निवडणुकीत त्यांना जे चित्र पहावे लागले. त्यामुळे आज 'याला भेट, त्याला भेट दुसऱ्या दिवशी घरी थेट' अशी स्थिती यांची झाली आहे. असा टोला शिंदे यांनी लगावला आहे .

## पवनानगर परिसरात कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत बदल

### थर्टी फर्स्ट, न्यू इयर सेलिब्रेटसाठी पवनानगरला येताय, तर पर्यायी मार्गाचा वापर करा

| पिंपरी |
प्रतिनिधी : महाईन्यूज



पवनानगर परिसरात ३१ डिसेंबर आणि नववर्षारंभासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनामुळे वाहतूक कोंडी होऊ नये व कायदा, सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी ३० डिसेंबर मध्यरात्रीपासून ते ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत वाहतुकीत बदल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत.

पुणे-मुंबई-कामशेत बाजूकडून पवनानगर बाजारपेठेकडे येणारी हलकी चारचाकी वाहने बंद करून ती येळसे ग्रामपंचायत फाटा येथून डावीकडे शिवली (कोथुर्णे बाजूकडे) कोथुर्णे-मळवंडी उजवीकडे ब्राम्हणोलीकडे फाट्यावरून पुढे सरळ, ब्राम्हणोली फाटा मार्गे जवण रोडवरून फांगणे, ठाकूरसाई, खडक गेव्हेंडे, जवण, चावसर, मोरवे, तुंग अशी वळविण्यात आली आहे. परंतु पवनानगर, कालेगाव, आंबेगाव, शिंदगाव, पाले, घामनधरा, दुधिवरे बाजूस आणारी वाहने तसेच जड अवजड वाहने यांना सोडण्यात येईल. वेळसे ग्रामपंचायत फाटा येथून डावीकडे-शिवली (कोथुर्णे बाजूकडे) कोथुर्णे गाव येथून डावीकडे, मळवंडी उजवीकडे फाट्यापासून ब्राम्हणोलीकडे-वारू फाट्यावरून पुढे सरळ ब्राम्हणोली एकेरी वाहतूक करण्यात येणार आहे. मौजे ब्राम्हणोली, वारू, कोथुर्णे, शिवली येथील स्थनिक रहिवासी यांना येळसे बाजूकडे येण्यास बंदी करण्यात येत असून वारू फाटा ब्राम्हणोली फाटा-पवना नदी पूल, कालेगाव फाटा-पवना बाजारपेठ मार्गे वेळसे कामशेत या पर्यायी मागनि वळविण्यात येणार आहे.

### पवनानगर बाजारपेठ पर्यायी मार्ग

1चारू व ब्राह्मणोली येथील स्थानिक रहिवाशांना पढ़ना नदी पूल 2कालेफाटा-पवना बाजारपेठ असे येण्यास बंदी घालण्यात आली आहे. वास फाटा-मळवंडी, कोथुर्णे फाट्यावरून डावीकडे-कोथुर्णे गावातून पवनानगर बाजारपेठ या पर्याथी मागनि वाहतूक वळविण्यात येणार आहे, असे प्रशासनाने सांगितले आहे. 3जानेवारी रोजी मध्यरात्रीपासून ब्राह्मणोली फाट्यावरून उजवीकडे वारू फाटा सरळ-मळवंडी, कोथुर्णे फाट्यावरून डावीकडे कोथुर्णे गाव उजवीकडे-शिवली (वेळसे बाजूकडे) वेळसे ग्रामपंचायत फाटा, अशी एकेरी वाहतूक करण्यात येणार आहे.

# पुणे पालिकेने केली लाखोंची उधळण!

## पालिकेने लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा केला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पादचारी दिनाचे औचित्य साधून पुणे महानगरपालिकेने गेल्या आठवड्यात लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा केला. पादचारी हा राजा असल्याने त्यांना सुरक्षितपणे रस्त्यावरून चालता यावे, यासाठी पादचारी दिनानिमित्त महापालिकेने ११ डिसेंबरला विविध कार्यक्रम घेतले.**



या दिवशी लक्ष्मी रस्ता १२ तास वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी हा उपक्रम राबविला गेल्याचा दावा महापालिकेच्या वतीने केला जात असला तरी लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी बंद केल्याने या रस्त्याला समांतर असलेल्या केळकर, कुमठेकर, बाजीराव रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागून वाहतुकीचा फज्जा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. महापालिकेला रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांची किती काळजी आहे, हे दाखविण्यासाठी हा दिन साजरा करण्यात आला. एक दिवस शहरातील रस्ता वाहतुकीला बंद ठेवत एका दिवसाच्या उपक्रमासाठी महापालिकेने लाखो रुपये खर्च केले. एक दिवस पादचारी दिन साजरा केला म्हणजे आपली जबाबदारी संपली, असाच काही समज महापालिका प्रशासनाने करून घेतल्याचे दिसून आले. पादचारी दिनाचा एका दिवसाचा सोहळा पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून 'ये रे माझ्या मागल्या' असेच चित्र लक्ष्मी रस्त्यावर पाहायला मिळाले.लक्ष्मी रस्त्यांवरील पदपथ दुसऱ्या दिवसापासून पुन्हा पथारी व्यावसायिकांनी भरून गेले. ही अशीच स्थिती शहरातील बहुतांश पदपथांवर दररोजची असताना मग केवळ एका दिवसासाठी लाखो रुपयांचा खर्च करून पादचारी दिन साजरा करण्याचा महापालिका प्रशासनाचा हट्ट का? असा प्रश्नही यानिमित्त उपस्थित केला जात आहे. रस्त्यावरून चालणाऱ्या पादचारी नागरिकांना प्रोत्साहन मिळावे, त्याचे महत्त्व समजावे या उद्देशाने पुणे महापालिका पादचारी दिन साजरा करते. एक दिवसीय समाज प्रबोधन कार्यक्रमासाठी सुमारे ४७ लाखांचा खर्च करण्यात आला. मात्र यामुळे पायी चालणाऱ्या नागरिकांचे अपघात व जीवितहानीचे प्रमाण कमी होणार आहे का? उलट एक दिवसाच्या पादचारी दिनामुळे शहरातील वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली. वाहन चालकांना, पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागला. लक्ष्मी रस्ता बंद केल्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीचा कोणताही अभ्यास न करता महापालिकेने हा प्रयोग केला, असा आरोप केला जात आहे. एक दिवसासाठी स्टंटबाजी करून पादचारी दिन साजरा करायचा, नागरिकांच्या कष्टाचा व घामाचा कररूपी गोळा केलेला पैसा हा अशा प्रकारे वाया घालविणे योग्य नाही. केवळ एक दिवस हा दिन साजरा करून शहरातील वाहतूक कोंडी, पार्किंग, रस्ते,आजही लक्ष्मी रस्त्याचे रुंदीकरण झालेले नाही. असे असताना लाखो रुपयांची उधळपट्टी करून प्रशासन पुणेकरांची दिशाभूल करत आहे. यापेक्षा प्रशासनाने चांगले रस्ते, वाहतूक कोंडी, पार्किंग, वाहन तळांवर होणारी लूट, पदपथावरील अतिक्रमणे, अपघात, जीवितहानी या समस्या सोडवून वाहनचालक, पादचारी यांना जीवनदान देण्यासाठी भरीव कार्य करावे.

### उपनगरांमध्ये प्रयोग करावेत

महापालिकेच्या एक दिवसाच्या पादचारी दिनाने लक्ष्मी रस्त्यावरील पादचारी कदाचित सुखावले असतील. पण बाजीराव रस्ता व इतर समांतर व संलग्न रस्त्यांवरील वाहतूक कोंडीत ताटकळून अनेक वाहनचालक दुखावले गेले. या गल्लीबोळांसारख्या रस्त्यांवरून चालत जाणारे पादचारीही हतबल झाले. महापालिकेने लक्ष्मी रस्त्यावर 'पादचारी दिन' साजरा करण्यापेक्षा, कोथरूडमधील प्रतीक नगर, पिंपळे सौदागर, औंध अशांसारख्या उपनगरांमधील मोठ्या रस्त्यांवर, ज्यांच्या काही भागांत पादचाऱ्यांनी मनसोक्त बागडावे आणि वाहनांनीही आपली मार्गिका सांभाळत सुखाने जावे. महापालिकेने हा प्रयोग केवळ पादचारी दिनानिमित्त न करता वर्षभरात केव्हाही करावा.

# सावरकरांची होणारी उपेक्षा ही शोकांतिका

## सावरकर' विषयावर कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी फक्त देशातून नव्हे तर थेट शत्रूच्या घरात घुसून स्वातंत्र्याची लढाई लढली. इंग्लडमधील ज्या 'इंडिया हाऊस' मध्ये वास्तव्य करून सावरकरांनी या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिनिधित्व केले. त्याच इंडिया हाऊसच्या बाहेर आज तेथील ब्रिटिश सरकारने सावरकरांच्या गौरवार्थ फलक लावला आहे.**

म्हणजे ज्या इंग्रज सरकारविरोधात लढण्यात सावरकरांनी आपले आयुष्य पणाला लावले त्या शत्रूने त्यांचा गौरव केला. मात्र दुसरीकडे ज्या देशवासीयांसाठी त्यांनी हा लढा लढला त्याच देशवासीयांकडून आज त्यांची उपेक्षा होत आहे, यासारखी दुसरी शोकांतिका नाही, असे प्रतिपादन व्याख्यात्या अपर्णा कुलकर्णी यांनी केले. चिंचवड देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळ्यात मंगळवारी (दि. १७) 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या विषयावर अपर्णा कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार देव महाराज हे उपस्थित होते.आपल्या व्याख्यानात अपर्णा कुलकर्णी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या आयुष्यातील झंझावाती कार्याचे साक्षीदार असलेल्या आठ



महत्वपूर्ण स्थानांची महिती आणि माहिती सांगितली. त्या म्हणाल्या, ज्याप्रमाणे श्री गणरायाची आठ महत्वपूर्ण तीर्थक्षेत्र अष्टविनायक म्हणून ओळखली जातात. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनात या आठ ठिकाणांना अष्टविनायकाएवढेच महत्व आहेत. ज्या ठिकाणांना भेट दिल्यानंतर आपल्याला देशप्रेमाची प्रेरणा मिळते. या ठिकाणांमध्ये पहिले सावरकरांचे नाशिक येथील जन्मस्थान, दुसरे नाशिक येथील भगूर या ठिकाणी असलेल्या अष्टभुजा देवीचे मंदिर ज्याठिकाणी त्यांनी "मारता मारता मरेतो झुंजेन" ही स्वातंत्र्यलढ्याची सशस्त्र क्रांतीची पहिली प्रतिज्ञा घेतली, तिसरे ठिकाण नाशिकमधील तीळभांडेश्वराच्या गल्लीतील भाड्याचे घर ज्याठिकाणी त्यांनी मित्र मेळ्याच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीचे बीज रोवण्याचे काम केले. पुढील चौथे ठिकाण पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज येथील जेन्ट्स ब्लॉकमधील खोली क्रमांक १७. याठिकाणी त्यांनी समवयस्क आणि समविचारी मित्रांना एकत्रित करून त्यांनी अभिनव भारत संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. पुढे पाचवे ठिकाण ते थेट लंडनमधील इंडिया हाऊस ही वास्तू, याठिकानाहूनच सावरकर यांनी भारतातील क्रांतीकारकांना अत्याधुनिक शस्त्र पुरविण्याचे क्रांतिकारी कार्य केले.पुढे सहावे ठिकाण म्हणजे मार्सेलिनचा किनारा, ज्यावेळी सावरकरांना व्हिक्टोरिया स्टेशनवर अटक करून खटला चालविण्यासाठी त्यांना 'मोरया' बोटीमधून भारतात आणण्यात येत असते.

### सावरकरांच्या प्रेरणास्थळांना भेट द्यावी

मात्र मार्सेलीनच्या किनाऱ्यावर त्यांना पुन्हा पकडण्यात येते. त्यांच्या अष्टविनायकातील सातवे ठिकाण म्हणजे अंदमानचे तुरुंग ज्याठिकाणी त्यांनी काळ्यापाण्याची शिक्षा भोगली. तर शेवटचे आठवे ठिकाण म्हणजे रत्नागिरी येथील स्थानबद्धतेत राहिलेले ठिकाण, ज्याठिकाणी त्यांनी हिंदू धर्मातील स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भेदाभेदीच्या भिंती तोडण्यासाठी जीवाचे रान केले. याठिकानीच त्यांनी पतित पावन मंदिर बांधले. व आयुष्याच्या शेवटी मुंबईतील दादर येथील सावरकर सदन याठिकाणी आपला देह ठेवला. प्रत्येक भारतवासीयांनी आयुष्यात किमान एकदा तरी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या या आठ प्रेरणास्थळांना भेट द्यावी.

### चिखली – कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर महापालिकेची कारवाई

# अनधिकृत अतिक्रमण निष्कासित!

## सुमारे 9000 चौ.मी. क्षेत्रातील 30 आर.सी.सी.बांधकामे, 45 वीट बांधकामे हटविली

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील मोरे पाटील चौक ते कुदळवाडी पोलीस चौकी येथे १८ मीटर रुंद डी.पी. रस्ता (३०० मीटर लांबी ) व कुदळवाडी पोलीस चौकी ते विसावा चौक या ३० मीटर रुंद डी.पी.रस्ता ५५० मीटर लाबींच्या डी.पी. रस्ता रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ९००० चौ.मी. क्षेत्रातील ३० आर.सी.सी.बांधकामे, तसेच सुमारे ४००० चौ.मी. क्षेत्रामधील ४५ वीट बांधकामांसह पत्राशेड इत्यादीवर अतिक्रमण निष्कासनाची आज कारवाई करण्यात आली.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे – पाटील, शहर अभियंता मकरंद निकम व मनोज लोणकर उपआयुक्त यांचे निर्देशानुसार कारवाई करणेत आली.

क,इ व फ़ क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, राजेश आगळे , सिताराम बहुरे तसेच कार्यकारी अभियंता सुर्यकांत मोहिते (बांधकाम परवानगी), कार्यकारी अभियंता क स्थापत्य सुनिलदत्त नरोटे, उपअभियंता मनोज बोरसे, नरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता संदिप वैद्य, किरण सगर, अशोक मोरे, अश्रुबा वाकोडे, इम्रान कलाल, अनिल गडदे, व क्षितीजा देशमुख, तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सुमीत जाधव,ऐश्वर्या मासाळ, निकिता फ़डतरे, स्मिता गव्हाणे व इतर इ व फ़, कडील ०६ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व मनपा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल जवान , महाराष्ट्र पोलिस कर्मचारी यांच्या नियंत्रणाखाली सदर कारवाई करण्यात आली.

प्रभाग क्र.०२ चिखली / कुदळवाडी परिसरातील एकूण १३००० चौ.मी. आर.सी. सी.बांधकामे व पत्राशेडवर ०२ पोकलेन,०२ जेसीबी व ०२ मालवाहू ट्रक यांच्या सहाय्याने अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली.तसेच दि.१९/१२/२०२४ रोजी अतिक्रमण निष्कासनाची कारवाई सुरु राहणार आहे. दि.१८/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत क, इ व फ़ क्षेत्रीय कार्यालयाकडील अतिक्रमण पथक, ५६ महाराष्ट्र सुरक्षा बल जवान, स्थानिक पोलिस स्टेशन चिखली मधील बंदोबस्तात १२ अधिकारी / कर्मचारी तसेच महाराष्ट्र पोलीस अधिकारी / कर्मचारी सहभागी झाले होते.

### अनधिकृत पत्राशेड / बांधकाम करु नये

मंजूर विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेकामी कारवाई या पुढेही सुरु राहील, असे मनपा तर्फे आवाहन करणेत आले. दररोज शहराच्या विविध भागात अतिक्रमण कारवाई केली जात आहे, महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशनानुसार सदर कारवाई केलेल्या ठिकाणी मनपा परवानगी घेतल्याशिवाय अनधिकृत पत्राशेड / बांधकाम करु नये, अशा सूचना देण्यात आल्या.

## नववर्षाच्या स्वागतोत्सवात अंमली पदार्थांवर आळा घालावा

### ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतिश गोरडे यांचे पोलिसांना आवाहन

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“नववर्षाच्या स्वागतोत्सवात अंमली पदार्थांवर आळा घालावा” असे आवाहन ज्येष्ठ विधिज्ञ आणि विश्व हिंदू परिषद, विधी प्रकोष्ठाचे वतीने,पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे यांनी पोलीस आयुक्त पुणे व पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांना केले.**



शिक्षणाचे माहेरघर असा लौकिक असलेल्या पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील अल्पवयीन तरुण – तरुणींना अगदी सहजपणे अंमली पदार्थ उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २०२५ या नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने महाविद्यालयातील तरुण आणि तरुणी कुतूहल अन् आकर्षणापोटी अंमली पदार्थांच्या वाट्याला जातात. ही बाब हेरून तरुण पिढीला अंमली पदार्थ सहज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न म्हणून अंमली पदार्थांची निर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्या ड्रग्ज पेडलर (Drugs Paddler) इसमांद्वारे होण्याची दाट शक्यता आहे. यावर आळा घालण्यासाठी पुणे पोलीस प्रशासनाने स्टिंग ऑपरेशन (Sting Operation) राबववे अशी विनंती पोलीस आयुक्त, पुणे कार्यालयाला (दि.१७) लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील बालेवाडी हाई स्ट्रीट, कोरेगाव पार्क, पुणे स्टेशन, इराणी वस्ती, शिवाजीनगर स्टेशन, डॉ. डी. वाय. पाटील आणि एम.आय.टी. महाविद्यालयांचे परिसर, अप्पर सुपर इंदिरानगर मस्जिद, सॅलिसबेरी पार्क ही अंमली पदार्थ संवेदनशील ठिकाणे आहेत, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

२५ डिसेंबर ते ०१ जानेवारी या कालावधीत शोध मोहीम राबवून या संदर्भातील दोषी व्यक्तींवर कारवाई करावी, अशी विनंतीवजा आवाहन करण्यात आले असून या पत्राच्या प्रती नागपूर हिवाळी अधिवेशन २०२४ मुख्यमंत्री कार्यालय – नागपूर, महाराष्ट्र राज्य गृहमंत्री कार्यालय – मुंबई, पोलीस महासंचालक कार्यालय – मुंबई, एन सी बी ऑफिस – मुंबई येथे पाठविण्यात आल्या आहेत.

ॲड. सतिश गोरडे यांनी याबाबत अधिक माहिती देताना, भारतीय संविधानातील कलम ४७ – अ मध्ये अंमली पदार्थांच्या विक्री आणि वाहतुकीवरील निर्बंधांविषयी तरतुदींनुसार राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा ऊहापोह करण्यात आला आहे, असे सांगून विश्व हिंदू परिषदेतील विधी प्रकोष्ठ याविषयी सामाजिक जाणिवेतून जागरूकता निर्माण करीत आहे, असेही सांगितले. सदरहू लेखी पत्रावर ॲड. सतिश गोरडे यांच्यासह विधी प्रकोष्ट संयोजक ॲड. शैलेश भावसार, सहसंयोजक ॲड. सोहम यादव, ॲड. संकेत राव, ॲड. कृष्णा वाघमारे, ॲड. आशिष गोरडे, ॲड. सुशांत गोरडे, ॲड. महेश सोनवणे, ॲड. सौरभ साठे, ॲड. प्रसाद पवार, ॲड. ऋतुजा रणपिसे, ॲड. चित्रा मराठे आणि ॲड. आदित्य कोळपकर यांनी स्वाक्षरी केली आहे.

## पं. संजीव अभ्यंकर यांच्या ‘स्वररंजन भक्तिरसात’ रसिकश्रोते तल्लीन



। चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

श्रीमन् महासाधु श्री मोरया गोसावी महाराज यांच्या ४६३ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने नामवंत गायक पं. संजीव अभ्यंकर यांचा ‘स्वररंजन’ हा भक्तीगीतांचा कार्यक्रम श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिराच्या प्रांगणात आयोजित केला होता.

कार्यक्रमाच्या सुरवातीला चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र देव, केशव विद्वांस, ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. देवराज डहाळे यांच्या हस्ते पं. संजीव अभ्यंकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने सन्मान करण्यात आला.

‘तुज नमन असो प्रथमेशा’ या पं. संजीव अभ्यंकर यांनी गेलेल्या श्रीगणेश वंदनेने ‘स्वरसंजीवन’ कार्यक्रमाची सुरुवात झाली.त्यानंतर ‘ऐसे पंढरीचे स्थान; याहूनी आणिक आहे कोण’, ‘माझे चित्त तुझे पायी’, ‘बोलावा विठ्ठल; पाहावा विठ्ठल’, ‘श्री गुरुसारिखा असता पाठीराखा’, ‘ध्यान लागले रामाचे’ या एकाहून एक अवीट भक्तीगीतांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. ‘येथे का रे उभा श्रीरामा; मनमोहन मेघश्यामा’ या श्रीरामाच्या रचनेने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**निवडणूक जिंकली की 'ईव्हीएम' चांगले, आणि निवडणूक हरली की 'ईव्हीएम' वर शंका.. हा पूर्वीचा काँग्रेसचा फंडा आता 'महाविकास आघाडी'ने अलगद उचलला आहे. महाराष्ट्रात सपाटून मार खाल्ल्यानंतर सुरुवातीला काँग्रेसने गळे काढण्यास सुरुवात केली, त्यांच्या रडगाण्यात आवाज मिसळत नंतर उबाठा गट आणि हळूच शरद पवार गट यांनी (बे)सूर मिसळण्यास सुरुवात केली.एखादी एक गंमत बघा, महाराष्ट्राबरोबरच झारखंडमध्येही निवडणुका झाल्या, पण झारखंड मधील 'ईव्हीएम' व्यवस्थित आणि अचूक होत्या, असं काँग्रेसचं म्हणणं.. एकमेव कारण म्हणजे त्या ठिकाणी भारतीय जनता पक्षाचा पराभव झाला आहे.**

# 'ईव्हीएम' बदनाम हुई.. 'बिघाडी' तेरे लिये !



महाराष्ट्र सुद्धा ज्या ठिकाणी यांचे उमेदवार विजयी झाले, तेथील ईव्हीएम वर यांची शंका नाही, शंका फक्त एवढीच की भाजपा ला एवढे प्रचंड बहुमत कसे मिळाले? पाच सहा महिन्यापूर्वी लोकसभेच्या निवडणुका झाल्या आणि त्यावेळी महाविकास आघाडीला लक्षणीय कौल मिळाला, त्यावेळी यांना 'ईव्हीएम' मध्ये घोटाळा दिसला नाही, ही दुसरी गंमत. थोडी बुद्धी चालवली किंवा सारासार विचार केला तर उबाठा गट आणि शरद पवार गट यांचे टोमणे हे केवळ काँग्रेसच्या पाठोपाठ भरकटत जाण्यासारखे आहेत, असेच म्हणावे लागेल ! सर्वच राजकीय पक्षांना एक गोष्ट नक्की माहित आहे, की 'ईव्हीएम' च्या विरोधात जरी आवाज उठवला आणि सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली तरी त्याचे उत्तर मिळू शकणार नाही किंवा आहे हा निकाल कायम राखला जाईल, पण उगीचच साप साप करून भुई थोपटण्याचा प्रकार आहे, हे या राजकीय पक्षांना सुद्धा माहित आहे आहे. पण सत्ताधारी 'महायुती' ला प्रचंड विजयाचा आनंद मिळू द्यायचा नाही, हे यांचे ब्रीदवाक्य असल्यामुळे 'ईव्हीएम' च्या नावानं हे नक्राश्रू ढाळत आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

## गरळ ओकण्यापूर्वी सिद्ध करा !

'ईव्हीएम' च्या विरोधात बोलून रोज सकाळी गरळ ओकण्यापेक्षा जगातील शास्त्रज्ञांना किंवा कॉम्प्युटर तंत्रज्ञांना बोलावून हे सिद्ध करून दाखवावे, हाच त्यावर पर्याय आहे. पण हे कोणालाही शक्य नाही. काही वर्षांपूर्वी निवडणूक आयोगाने उघडपणे आव्हान दिले होते, की 'ईव्हीएम' हॅक होत आहे हे सिद्ध करा.. ते आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी स्वीकारले देखील होते. पण पंधरा दिवसाची मुदत घेऊन त्या दोघांना काहीही सिद्ध करता आले नाही. तसे असले तरी आत्ताच्या निकालावर सुद्धा हे दोघे नकारात्मक प्रतिक्रिया देण्यासाठी पुढे सरसावतात, ही खरी शोकांतिका म्हणावी लागेल. वास्तविक, देशात काँग्रेसची सत्ता होती त्यावेळी 'ईव्हीएम' स्वीकारण्याचा निर्णय झाला. त्यानंतर अनेक निवडणुका झाल्या, मग आत्ताच या काँग्रेसवाल्यांना अशी काय अवदसा आठवली? भारतावर 2004 आणि 2009 मध्ये काँग्रेसची सत्ता आली, त्यांचाच पंतप्रधान झाला, त्या वेळच्या निवडणुका देखील 'ईव्हीएम' वरच झाल्या, याचा यांना विसर पडला आहे का? मुळामध्ये नवीन तंत्रज्ञान स्वीकारायचे का पुन्हा एकदा जुन्या रहाटगाडग्याकडे वळायचे, हा न सुटलेला प्रश्न आहे.

## घवघवीत यश डोळ्यात खुपले !

१९७२ नंतर प्रथमच सत्ताधारी पक्षाला २२२ पेक्षा जास्त जागा मिळाल्या. २३६ जागा घेऊन महायुती सत्तारूढ झाली, तर भाजपला आतापर्यंत सर्वात जास्त जागा म्हणजे १३२ जागांवर विजय मिळवता आला आहे. हे होत असतानाच महाराष्ट्रातील विरोधी पक्षांची पुरती दाणादाण उडाली आहे. शिल्लक शिवसेनेला २० जागा काँग्रेसला १६ जागा तर शरद पवारांच्या शिल्लक राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त दहा जागा मिळाल्या आहेत. हे बघता महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर प्रथमच महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधी पक्षनेता राहणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सत्ताधाऱ्यांचे हे यश विरोधकांच्या डोळ्यात खुपले आहे. भाजपप्रणित 'महायुती' ला हे अनपेक्षित यश मिळाल्यामुळे साहजिकच आधी गुडघ्याला बाशिंग बांधून सत्तास्थापनेचे स्वप्न पाहणारे विरोधी पक्षाचे नेते अस्वस्थ झाले आहेत. त्यांनी नेहमी प्रमाणे हा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनचा प्रताप असल्याचा आरोप करून आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएम मशीन वर फोडले आहे. हे बघता परीक्षेत कमी गुण मिळवणारा किंवा नापास होणारा विद्यार्थी जसा परीक्षकाने भेदभाव केला असा आरोप करतो, किंवा खेळात हरलेला चमू किंवा खेळाडू पंचांनी योग्य न्याय दिला नाही, अशी तक्रार करतो, तसाच हा प्रकार सुरू असल्याचे दिसते आहे.

## रडत बसू नका, नेमकी कारणे शोधा..

मुळात महाराष्ट्रात विरोधी पक्षांची झालेली दाणादाण आणि 'महायुती' ला मिळालेले अनपेक्षित यश यामागची कारणे खूप वेगळी आहेत. खरे तर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या संदर्भात कठोर आत्मपरीक्षण करून पराभवाची कारणे शोधायला हवी होती. मात्र निकाल जाहीर व्हायला सुरुवात होताच शिवसेनेचे विश्वप्रवक्ते संजय राऊत यांनी हा लावून घेतलेला निकाल असून याला 'ईव्हीएम' जबाबदार आहे असा आरोप करून टाकला आणि त्याची री सगळ्यांनी ओढली. नाही म्हणायला राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी मतांचे ध्रुवीकरण हे पराभवाला कारणीभूत असल्याचा निष्कर्ष सांगितला. मात्र, दुसऱ्याच दिवशी त्यांनी टोपी फिरवत 'ईव्हीएम' लाच दोष द्यायला सुरुवात केली.

## विरोध नेमका केव्हा सुरू?

एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, २००४ मध्ये सर्वप्रथम या मशीनचा लोकसभा निवडणुकीत उपयोग करण्यात आला. तेव्हा केंद्रात भारतीय जनता पक्षप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार होते. या निवडणुकीत या आघाडीचा पराभव करीत काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सत्तेत आली. यावेळी काँग्रेस किंवा भारतीय जनता पक्ष यापैकी कोणीही या यंत्रणेचा उपयोग करण्याबाबत आक्षेप घेतला नाही. नंतर राज्या राज्यांमध्ये विधानसभांच्या निवडणुका झाल्या. तेव्हाही कोणाचाही आक्षेप नव्हता. २००९ च्या लोकसभा निवडणूक किती पुन्हा एकदा संयुक्त पुरोगामी आघाडी सत्तेत आली. तेव्हाही कोणाचा आक्षेप नव्हता. मात्र २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार पुन्हा सत्तेत आले आणि नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान बनले. तेव्हापासून विरोधकांचा ईव्हीएम मशीनला विरोध सुरू झाला आहे. काँग्रेस पक्षाने या संदर्भात जन आंदोलन उभारण्याचा पवित्रा घेतला आहे आणि सह्यांची मोहिमदेखील राबविण्यात येणार आहे. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी या मुद्द्यावर पुन्हा एकदा देशव्यापी पदयात्रा काढणार असल्याचे देखील सांगितले आहे.

शिवसेना उबाठा गट निवडणूक आयोगाकडे दाद मागणार आहे, तर शिल्लक राष्ट्रवादीचे नेते शरद पवार न्यायालयीन लढाई लढणार आहेत अशी त्यांनी घोषणा केली आहे. मात्र ही घोषणा ते करीत असतानाच सर्वोच्च न्यायालयात या 'ईव्हीएम' मशीनच्या वापराबाबत बंदी आणावी, अशी मागणी करणारी एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी निकाल देताना तुम्ही निवडणूक हरलात की ईव्हीएम यंत्रणा वाईट असे म्हणता आणि तुम्ही जिंकलात की ती चांगली असते असे चालणार नाही, अशा शब्दात याचिकाकर्त्यांवर ताशेरे ओढले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे हे निरीक्षण निश्चितच विरोधकांच्या डोळ्यात अंजन घालणारे म्हणावे लागेल. मात्र अजूनही विरोधी पक्ष या प्रकरणात भानावर आलेले नाहीत.

वरील सर्व मुद्दे लक्षात घेतल्यास विरोधकांचा 'ईव्हीएम' मशीनच्या विरोधातील कांगावा हा निरार्थक म्हणावा लागेल. या समुद्रमंथनातून काहीही निष्पन्न होणार नाही, हे सत्ताधाऱ्यांना माहित असून सुद्धा विनाकारण मतदारांची सहानुभूती घेण्याचा हा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. विकास कामे करा, मग जनता डोक्यावर घेऊन नाचेल, ईव्हीएमसी जनतेला देणंघेणं नाही, हा संदेश जनतेने दिला आहे. हे नाना पटोले विजय वडेट्टीवार, शरद पवार, सुप्रिया सुळे तसेच संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांना समजावून कोण सांगणार? आणि समजावलेच तर ते पालथ्या घड्यावर पाणी, असेच वास्तव असणार हे खरे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बोट दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू!

## मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत जाहीर

। मुंबई ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मुंबईमधून एलिफंटाकडे जाणारी एक प्रवासी बोट बुधवारी सायंकाळी बुडाल्याची दुर्घटना घडली. या घटनेत तब्बल १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये तीन नौदल कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. तसेच या बोटमधून १०१ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भातील माहिती दिली.**





मुंबईवरून एलिफंटाकडे नीलकमल ही बोट जात होती. मात्र, या बोटीला गेट ऑफ इंडियाजवळ ही बोट बुडाल्याची घटना घडली. या बोटेतून १०० पेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करत होते. ही दुर्घटना घडल्यानंतर लगेचच तातडीने मदतकार्य करण्यात आले. यावेळी नौदलाने या बोटीमधील १०१ प्रवाशांना सुरक्षित वाचवलं. तर या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अद्यापही नौदलाकडून आणि पोलिसांच्या समन्वयाने बचाव कार्य करण्यात येत आहे. यामध्ये चार नौदलाचे हेलिकॉप्टर, ११ नौदल क्राफ्ट आणि एक तटरक्षक दलाची नौका आणि तीन सागरी पोलीस नौका बचावकार्य करत असल्याची माहिती देण्यात आली आहे."मुंबई शहराजवळ अरबी समुद्रात नीलकमल कंपनीच्या एका प्रवाशी बोटीच्या अपघाताची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेत सायं.७.३० पर्यंत प्राप्त माहितीनुसार, बोटीतील एकूण प्रवाशांपैकी १०१ लोकांना सुरक्षित वाचवण्यात आलं आहे. नौदलाचे व्हाईस ॲडमिरल संजय जगजित सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, नौदलाच्या डॉक्टरांनी सायंकाळी ७.३० पर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यात ३ नौदलाचे जवान असून १० नागरिक आहेत. या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.तसेच २ गंभीर जखमींना नौदल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेता नौदल, कोस्टगार्ड, मुंबई पोलिस यांनी तातडीने बचावकार्य हाती घेतले. या बचावकार्यात नौदलाचे ११ क्राफ्ट आणि ४ हेलिकॉप्टर्सची मदत घेण्यात आली. अद्यापही शोधकार्य सुरुच आहे. त्यामुळे सविस्तर माहिती उद्यापर्यंत प्राप्त होईल. मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल. या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये म्हटलं आहे.अपघातानंतर प्रवाशांना किनाऱ्यावर आणण्यात आलं. त्यापैकी एका प्रवाशाने सांगितलं, आमची बोट पाच ते सात किमी समुद्रात होती. त्यावेळी मी बोटीच्या डेकवर उभा होतो. एक स्पीड बोट आमच्या आजूबाजूला फिरत होती. ही स्पीड बोट आम्हाला धडकू शकते अशी भीती मला वाटली. नेमकं घडलंही तसंच. ही स्पीडबोट भरधाव वेगाने आली आणि आमच्या बोटीला जोरात धडकली. त्यावेळी स्पीडबोटमधल्या काही प्रवाशांचा मृत्यू झाला तर दुसऱ्याचा पाय कापला गेला. रक्तबंबाळ अवस्थेतल्या त्या जखमी प्रवाशाला आमच्या बोटीत घेण्यात आलं. स्पीडबोटची धडक जोरात बसल्याने आमच्या बोटीत पाणी शिरु लागलं आणि बोट बुडू लागली अशी माहिती या प्रत्यक्षदर्शी प्रवाशाने दिली आहे. एबीपी माझा या वाहिनीशी बोलताना ही माहिती त्याने दिली.मुंबईवरून एलिफंटाकडे नीलकमल ही बोट जात होती. मात्र, या बोटीला गेट ऑफ इंडियाजवळ ही बोट बुडाल्याची घटना घडली. या बोटेतून १०० पेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करत होते. ही दुर्घटना घडल्यानंतर लगेचच तातडीने मदतकार्य करण्यात आले. यावेळी नौदलाने या बोटीमधील १०१ प्रवाशांना सुरक्षित वाचवलं. तर या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अद्यापही नौदलाकडून आणि पोलिसांच्या समन्वयाने बचाव कार्य करण्यात येत आहे. यामध्ये चार नौदलाचे हेलिकॉप्टर, ११ नौदल क्राफ्ट आणि एक तटरक्षक दलाची नौका आणि तीन सागरी पोलीस नौका बचावकार्य करत असल्याची माहिती देण्यात आली आहे."मुंबई शहराजवळ अरबी समुद्रात नीलकमल कंपनीच्या एका प्रवाशी बोटीच्या अपघाताची घटना अत्यंत दुर्दैवी आहे.

### 5 लाख रुपयांची आर्थिक मदत

मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल. या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये म्हटलं आहे.अपघातानंतर प्रवाशांना किनाऱ्यावर आणण्यात आलं. त्यापैकी एका प्रवाशाने सांगितलं, आमची बोट पाच ते सात किमी समुद्रात होती. त्यावेळी मी बोटीच्या डेकवर उभा होतो. एक स्पीड बोट आमच्या आजूबाजूला फिरत होती. ही स्पीड बोट आम्हाला धडकू शकते अशी भीती मला वाटली. नेमकं घडलंही तसंच. ही स्पीडबोट भरधाव वेगाने आली आणि आमच्या बोटीला जोरात धडकली. त्यावेळी स्पीडबोटमधल्या काही प्रवाशांचा मृत्यू झाला तर दुसऱ्याचा पाय कापला गेला.

---

# दोन ते तीन दिवसात मंत्रिमंडळ खातेवाटप

## महायुतीच्या सरकारमधील खातवाटप कधी होणार :उदय सामंत

। मुंबई ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महायुतीच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा पार पडला मात्र अद्याप खातेवाटप जाहीर झाले नाही. दरम्यान महायुतीच्या सरकारमधील खातवाटप कधी होणार? असा प्रश्न विरोधकांकडून विचारला जात आहे. या पार्श्वभूमीवर आता शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषद सभापती पदाची निवडणूक आणि मंत्रिमंडळाचे खातेवाटप याबद्दल महत्वाची माहिती दिली आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट सांगितलं आहे की दोन ते तीन दिवसात खातेवाटप होईल दुसरा दिवस आज रात्री बारा वाजता संपणार आहे आणि तिसरा दिवस उद्या १२ वाजता संपणार आहे. त्यामुळे सांगितलेल्या आश्वासनाला उद्या १२ वाजेपर्यंतची मुदत आहे. उद्या १२ वाजण्याआगोदर खातेवाटप होईल याची खात्री बाळगा.



विधान परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक देखील उद्या होणार असल्याचे सांगितले जात आहे. याबद्दल बोलताना सामंत यांनी सांगितलं की, विधान परिषदेचा सभापती कोण असावा? तो भाजपाचा असावा, शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचा असावा की राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा असावा हे ठरवण्याचे शिवसेना पक्षाचे सर्व अधिकार आमचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे विधान परिषदेच्या सभापती पदाबाबत जो काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य राहील. महायुतीच्या ३९ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली असून फडणवीसांच्या मंत्रिमंडळात आता भाजपाच्या २० शिवसेनेच्या (शिंदे) १२ व राष्ट्रवादीच्या (९) मंत्र्यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळ विस्तारादरम्यान ३३ कॅबिनेट मंत्र्यांनी शपथ घेतली. तर सहा आमदारांना राज्यमंत्रीपदाची शपथ देण्यात आली होती. यापूर्वी देखील राज्यात महायुतीचं सरकार होतं. मात्र, या नव्या सरकारमध्ये काही नवीन चेहरे पाहायला मिळत आहे.

### नव्या सरकारमध्ये काही नवीन

नव्या सरकारमध्ये भाजपाने नऊ, शिवसेनेने (शिंदे) सहा व राष्ट्रवादीने (अजित पवार) पाच नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.विधान परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक देखील उद्या होणार असल्याचे सांगितले जात आहे. याबद्दल बोलताना सामंत यांनी सांगितलं की, विधान परिषदेचा सभापती कोण असावा? तो भाजपाचा असावा, शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचा असावा की राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा असावा हे ठरवण्याचे शिवसेना पक्षाचे सर्व अधिकार आमचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे विधान परिषदेच्या सभापती पदाबाबत जो काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य राहील.

# महाराष्ट्रात 203 कोटींचं नुकसान

## अधिवेशनादरम्यान कॅगचा अहवाल लोकसभेमध्ये सादर

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान १६ डिसेंबर रोजी लोकसभेत कॅगचा अहवाल सादर करण्यात आला. या अहवालामध्ये महाराष्ट्रातील रस्ते बांधकाम व या कामातील दिरंगाई याच्या परिणामस्वरूप निर्माण झालेल्या परिस्थितीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचं तब्बल २०३ कोटींचं नुकसान झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. प्रामुख्याने नांदेड व ठाणे जिल्ह्यातील रस्ते बांधकाम प्रकल्पांसंदर्भात या अहवालात माहिती देण्यात आली असून कंत्राटदारांकडून अपेक्षेपेक्षा अत्यल्प प्रमाणात नुकसान भरपाई वसूल झाल्यामुळे हे नुकसान झाल्याचंही नमूद करण्यात आलं आहे.**



केंद्रीय दक्षता आयोगानं घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचं उल्लंघन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) केल्याचा ठपका कॅगच्या अहवालात ठेवण्यात आला आहे. एनएचएआय रस्ते वाहतूक व महामार्ग खात्याच्या अखत्यारीत येत असून कॅगचा संबंधित अहवाल ४ नोव्हेंबर रोजीच खात्याकडे पाठवण्यात आल्याचं इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे.अहवालात नमूद केल्यानुसार, मार्च २०१८ मध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं चार राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकरणाचं काम बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर कंत्राटदारांना दिलं. या प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च ४ हजार १०४ कोटी ७० लाख इतका होता. त्यात औसा-चाकूर, चाकूर-लोहा व लोहा-वारंगा हा ३६१ क्रमांकाचा राष्ट्रीय महामार्ग आणि वडापे-ठाणे हा ३ क्रमांकाच्या राष्ट्रीय महामार्गाचा (आधीचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८) पट्टा अशा रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामाचा समावेश होता. NHAI च्या नांदेडमधील प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन युनिट अर्थात पीआययूतर्फे त्या जिल्ह्यातील तर ठाण्यातील पीआययूतर्फे ठाण्यातील रस्तारुंदीकरणाच्या कामाची देखरेख केली जात होती.

या प्रकल्पांसाठी निवडण्यात आलेल्या कंत्राटदार कंपन्यांनी चार उपकंपन्या स्थापन केल्या व या कंपन्यांनी ४ जुलै २०१८ रोजी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासोबत करार केला. मात्र, प्रकल्पांच्या पहिल्या टप्प्यासाठी २० टक्के काम पूर्ण होणं अपेक्षित असताना प्रत्यक्षात पूर्तीसाठी निश्चित केलेल्या तारखेला शून्य टक्के काम झालेलं होतं. यामुळे जुलै २०२० मध्ये NHAI च्या प्रकल्प संचालकांनी संबंधित कंत्राट रद्द करण्याची शिफारस केली. यादरम्यान, संबंधित कंत्राटदार कंपन्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे करारातील एका कलमान्वये प्रकल्पाच्या मालकीमध्ये बदल करण्याची विनंती केली. जुलै २०२०मध्ये एनएचएआयनं याला मान्यताही दिली. सप्टेंबर २०२१ व जानेवारी २०२१ मध्ये महामार्ग प्राधिकरणानं या बदलांना प्राथमिक परवानगी दिली.मात्र, या प्रक्रियेमध्य NHAI नं नियम वाकवल्याचा ठपका कॅगच्या अहवालात ठेवण्यात आला आहे. आधीच्या निकषांनुसार, अशा प्रकारच्या बदलांसाठीच्या एनएचएआयच्या प्राथमिक मंजुरीसाठी आधीच्या मालक कंपन्यांनी एकूण प्रकल्प किमतीच्या १ टक्के रक्कम दंड म्हणून भरणं आवश्यक होतं. ही रक्कम अंतिम मंजुरीच्या आधी जमा करणं आवश्यक होतं. पण या प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यावर एनएचएआयनं या निकषांमध्ये बदल केले. कराराच्या यासंदर्भातील कलमात एक कलम समाविष्ट केलं. यानुसार, दंडाची ही रक्कम प्रकल्पाचे पुढचे टप्पे पूर्ण झाल्यावर कंत्राटदारांना दिल्या जाणाऱ्या निधीमधून वजा करण्याची तरतूद करण्यात आली."यासंदर्भात कॅगला आढळून आलं की, NHAI नं आकारलेली ४९.२४ कोटींची नुकसान भरपाई ही वास्तवात करारातील मूळ निकषांपेक्षा खूप कमी आहे. एनएचएआयनं मालकी बदलाला प्राथमिक मंजुरी देईपर्यंतच्या निकषांनुसार ही रक्कम तब्बल २५२.३१ कोटींच्या घरात जाते", असं अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

### कसं झालं 203 कोटींचं नुकसान?

दरम्यान, प्रकल्प किमतीच्या १ टक्के नुकसानभरपाईची कमाल मर्यादा कशी ठरली, यावरून रस्ते व वाहतूक मंत्रालय आणि कॅग यांच्यात दुमत दिसून येत आहे. एकीकडे १ टक्के नुकसान भरपाईची ही मर्यादा २०१४ च्या सर्क्युलरनुसारच ठरवण्यात आल्याचं केंद्रीय खात्याचं म्हणणं असताना कॅगनं मात्र २०१४ नंतर करण्यात आलेल्या करारांमध्ये या कमाल मर्यादा निकषाचा अंतर्भाव न केल्याचा ठपका कॅगनं ठेवला आहे. हे करण्याची संधी असूनही एनएचएआयनं हे केलं नसल्याचंही कॅगनं नमूद केलं आहे. याशिवाय, कॅगनं जुन्या कंत्राटदार कंपन्यांवरील नुकसान भरपाईची जबाबदारी नव्या प्रकल्प मालक कंत्राटदार कंपन्यांवर टाकण्याच्या एनएचएआयच्या निर्णयावरही ताशेरे ओढले आहेत. जुन्या कंत्राटदार कंपन्यांसाठी एनएचएआयकडे २०५.२५ कोटींची परफॉर्मन्स बँक गॅरंटी होती.

---

# 'वन इलेक्शन'साठी जेपीसीची स्थापना

## सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदेंसह 31 सदस्यांचा समितीत सहभाग

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या वर्षभरापासून देशभरात 'वन नेशन, वन इलेक्शन'ची जोरदार चर्चा सुरु आहे. देशभरात एकाच वेळी सर्व निवडणुका घेण्यासंदर्भातील या विधेयकाबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षात मतमतांतरे आहेत. मात्र, १७ डिसेंबर रोजी हे विधेयक लोकसभेत चर्चेसाठी मांडण्यात आलं. पण या विधेयकाला इंडिया आघाडीसह अजून काही पक्षांनी जोरदार विरोध केला.**



यावरून सभागृहात गोंधळ देखील पाहायला मिळाला. यानंतर 'वन नेशन, वन इलेक्शन' या विधेयकावर सभागृहात मतदान घेण्यात आलं. यावेळी विधेयकाच्या बाजूने २६९ सदस्यांनी तर १९८ सदस्यांनी विरोधात मतदान केलं. यानंतर हे 'वन नेशन, वन इलेक्शन' हे विधेयक संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्यात आलं. त्यामुळे आता संसदीय समितीत यावर चर्चा होईल आणि सर्व पक्षांची मते ऐकून घेतली जातील. आता या वन नेशन, वन इलेक्शन विधेयकासाठी ३१ सदस्यीय संसदीय समिती (जेपीसी) स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये २१ सदस्य हे लोकसभेतील असतील तर १० सदस्य हे राज्यसभेतील असणार आहेत. या समितीमध्ये काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी, राष्ट्रवादीच्या (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, खासदार अनुराग ठाकूर, खासदार श्रीकांत शिंदे, 'टीएमसी'चे कल्याण बॅनर्जी, खासदार धर्मेंद्र यादव यांच्यासह आदींचा समावेश आहे. यासंदर्भातील वृत्त इंडीया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, 'वन नेशन, वन इलेक्शन' विधेयकाला केंद्रीय मंत्रीमंडळाने १२ डिसेंबर रोजी या विधेयकाला मंजुरी दिली होती. त्यानंतर हे विधेयक लोकसभेत चर्चेसाठी मांडण्यात आलं. मात्र, यावेळी सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही बाजूंनी विधेयकाच्या समर्थनार्थ व विरोधातील भूमिका मांडण्यात आल्या. यामध्ये या विधेयकाच्या बाजूने भाजपासहीत एकूण ३२ पक्षांचा पाठिंबा आहे, तर १५ पक्षांचा या विधेयकाला विरोध आहे. दरम्यान, आता या विधेयकावर संसदीय समितीत (जेपीसी) चर्चा होणार आहे.

### जेपीसीच्या सदस्यांमध्ये कोणाचा सहभाग?

आता संसदीय समितीत या विधेयकाबाबत नेमकं काय चर्चा होते? याकडे अनेकाचं लक्ष असणार आहे.पी.पी चौधरी, सीएम रमेश, बन्सुरी स्वराज, परशोत्तमभाई रुपाला, अनुराग ठाकूर, विष्णू दयाल राम, ब्रर्तुहरी महताब, संबित पात्रा, अनिल बलुनी, विष्णू दत्त शर्मा, प्रियांका गांधी वाड्रा, मनीष तिवारी, सुखदेव भगत, धर्मेंद्र यादव, कल्याण बॅनर्जी, टीएम सेल्वागणपती, जीएम हरीश बालयोगी, सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदे, चंदन चौहान, बालशौरी वल्लभनेनी यांच्यासह राज्यसभेतील १० सदस्यांचा सहभाग आहे.

# 80-90 च्या दशकात माझ्या दोन बायका होत्या!



गोविंदा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. ८० आणि ९० च्या काळात गोविंदाने अनेक सुपरहिट चित्रपट दिले. अभिनेत्यासह गोविंदा एक चांगला डान्सरही आहे. सोशल मीडियावर गोविंदा नेहमी सक्रिय असतो. व्हिडीओ आणि फोटो शेअर करीत तो चाहत्यांच्या संपर्कात असतो. नुकताच गोविंदाने त्याच्याबद्दल एक मोठा खुलासा केला आहे. नुकताच गोविंदाने रमेश तौरानी यांच्या दिवाळी पार्टीत हजेरी लावली होती. या पार्टीत प्रसिद्ध दिग्दर्शक डेव्हिड धवनही सहभागी झाले होते. गोविंदाने आपल्या इन्स्टाग्रामवर डेव्हिड धवन यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे. गोविंदाने फोटो शेअर करीत लिहिले "८० आणि ९० च्या दशकात माझ्या दोन पत्नी होत्या. एक सुनीता आणि एक डेव्हिड" गोविंदाची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. अनेक चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट केली आहे. गोविंदा आणि डेव्हिड धवनच्या जोडीने अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. त्यामध्ये कुली नंबर १, हिरो नंबर १, शोला और शबनम, राजा बाबू, आँखे व पार्टनर यांसारख्या चित्रपटांचा समावेश आहे.

# सोनाक्षी सिन्हावर योग्य संस्कार केले नाहीत

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हावर वडील शत्रुघ्न सिन्हा यांनी योग्य संस्कार केले नाहीत, असं वक्तव्य 'शक्तिमान' फेम मुकेश खन्ना यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावर सोनाक्षी सिन्हा भडकली व तिने एक पोस्ट शेअर करून त्यांना उत्तर दिलं. तसेच शत्रुघ्न सिन्हा यांनीही प्रतिक्रिया देत खन्ना यांची पात्रता काढली. आता मुकेश खन्ना यांनी सोनाक्षीच्या पोस्टनंतर स्पष्टीकरण दिलं आहे. सोनाक्षीचं नाव घेऊन फक्त एक उदाहरण देत होतो, असं खन्ना यांनी म्हटलं आहे. "मला आश्चर्य वाटतंय की सोनाक्षीने प्रतिक्रिया देण्यासाठी इतका वेळ घेतला. 'कौन बनेगा करोडपती' शोमधील त्या प्रसंगावरून मी तिचे नाव घेऊन फक्त एक उदाहरण देत होतो. तिची किंवा तिच्या वडिलांची बदनामी करण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. तिचे वडील माझे वरिष्ठ आहेत व माझे त्यांच्याशी चांगले संबंध आहेत", असं मुकेश खन्ना यांनी न्यूज९ला सांगितले.मुकेश खन्ना पुढे म्हणाले, "आताची पिढी ज्यांना जेन-झी म्हटलं जातं, त्यांच्याबद्दल बोलायचा माझा हेतू होता. जेन-झी पिढी गुगल आणि मोबाईल फोनची गुलाम झाली आहे. त्याचे ज्ञान विकिपीडिया आणि युट्यूबवरील सोशल कॉन्टॅक्टपुरते मर्यादित झाले आहे. याबद्दल बोलताना माझ्यासमोर एक मोठं उदाहरण (सोनाक्षी सिन्हा) होतं, त्यामुळे मी इतरांना शिकवण्यासाठी ते वापरलं."आपल्या संस्कृतीत आणि इतिहासात बरेच ज्ञान आहे, जे आजच्या प्रत्येक तरुणाला माहीत असायला पाहिजे आणि त्याचा अभिमानही वाटायला पाहिजे. एवढंच", असं मुकेश खन्ना म्हणाले. सोनाक्षीने २०१९ मध्ये 'कौन बनेगा करोडपती' या शोमध्ये हजेरी लावली होती.





# 'लापता लेडीज' ऑस्करच्या शर्यतीतून बाहेर

ऑस्करमधील बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म पुरस्कारासाठी पात्र १५ चित्रपटांची यादी जाहीर झाली आहे. मात्र, भारताकडून ऑस्करसाठी पाठवलेल्या 'लापता लेडीज' (LOST LADIES) या चित्रपटाचा त्यात समावेश नसल्याने याची चर्चा सुरू झाली आहे. किरण राव दिग्दर्शित हा चित्रपट 'फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया'ने (FFI) भारताकडून अधिकृत एन्ट्री म्हणून ऑस्करसाठी पाठवला होत.' परंतु, अनेकांनी असा दावा केला की पायल कपाडियाचा 'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट' हा चित्रपट अधिक चांगला पर्याय होता.'लापता लेडीज' ऑस्करच्या शर्यतीतून बाद झाल्याने प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर निराशा पसरली आहे. अनेकांनी सोशल मीडियावर 'फिल्म फेडरेशन ऑफ इंडियावर' टीका केली आहे. चित्रपट दिग्दर्शक हंसल मेहता आणि यांनीही यावर आपली नाराजी व्यक्त केली.हंसल मेहताने 'X' या प्लॅटफॉर्मवर ऑस्करच्या ९७ व्या पुरस्कार सोहळ्यातील बेस्ट इंटरनॅशनल फीचर श्रेणीतील शॉर्टलिस्ट शेअर केली. त्यांनी उपरोधिकपणे लिहिले, "फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया पुन्हा एकदा करून दाखवलं! त्यांचा चित्रपट निवडीचा रेट वर्षानुवर्षे खरोखरच 'परफेक्ट' आहे!"यावर अनेक युजर्सनी हंसल यांच्या मताला समर्थन दिले. एकाने लिहिले, "इंडियन फिल्म्स लापता!" तर दुसऱ्या एका युजरने कमेंट करत शेखर कपूरच्या 'बँडिट क्वीन' आणि रितेश बत्राच्या 'लंचबॉक्स' या चित्रपटांचा उल्लेख करत FFI ने या चित्रपटांचीही ऑस्करसाठी केली नसल्याची आठवण करून दिली.

# 'जिगरा'ची पहिली झलक आली समोर

अभिनेत्री आलिया भट्टचा प्रवास बॉलीवूडमध्ये 'स्टुडंट ऑफ द इयर' पासून सुरू झाला. पुढे 'हम्टी शर्मा की दुल्हनिया', 'कपूर अँड सन्स' आणि 'बद्री की दुल्हनिया' या सिनेमांत तिने ग्लॅमरस भूमिका केल्या. तर 'हायवे', 'राझी' या सिनेमांतून तिने तिच्या सशक्त अभिनयाची चुणूक दाखवली. पुढे 'गंगूबाई काठीयावाडी' सिनेमाच्या माध्यमातून बॉयकॉट बॉलीवूड हा ट्रेंड सुरू असतानाही, तिने प्रेक्षकांना सिनेमागृहापर्यंत खेचून आणले. 'गंगूबाई'ने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. अभिनेत्रीही प्रेक्षकांना सिनेमागृहापर्यंत आणू शकते, हे आलियाने दाखवून दिले. मुलगी राहाच्या जन्मानंतर तिने काही काळासाठी सिनेमातून ब्रेक घेतला होता. त्यामुळे काही काळाच्या अंतराने तिचे सिनेमे येत होते. 'रॉकी और राणी की प्रेम कहाणी' नंतर एक वर्षाने आलिया पुन्हा एका नव्या बॉलीवूड सिनेमात दिसणार आहे.



# मला देवाकडून मिळालेली सर्वात गोड भेट

बॉलीवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा नेहमी चर्चेत असते. यावर्षी स्पटेंबरमध्ये परिणीतीने आपचे नेते राघव चड्डा यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. दोघांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. आज राघव चड्डा यांचा ३५ वा वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त परिणीतीने खास पोस्ट शेअर करत राघव यांना शुभेच्छा दिल्या आहेत. परिणीतीने इन्स्टाग्रामवर राघव यांच्याबरोबर



काही फोटो शेअर केले आहेत. फोटो शेअर करत तिने लिहिले की, "तू मला देवाकडून मिळालेली सर्वात गोड भेट आहेस. तुझं मन आणि बुद्धी मला आश्चर्यचकित करते. तुझी तत्त्वे, प्रामाणिकपणा आणि विश्वास मला एक चांगला माणूस बनण्याची प्रेरणा देतात. तुझी शांतता माझ्यासाठी औषधासारखी आहे. आज माझा सर्वोत्तम दिवस आहे कारण आज तुझा जन्म झाला. मला निवडल्याबद्दल धन्यवाद. पोस्टमध्ये परिणीतीनी राघव यांच्याबरोबरचे काही रोमँटिक फोटो शेअर केले आहेत.

# गाबा कसोटी अनिर्णित राहिली!

## वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिकेत काय बदल झाला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सध्या सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना अनिर्णित राहिला आहे. सामन्याच्या शेवटच्या दिवशी दोन्ही संघांनी सामन्याचा निकाल कोणत्या तरी एका संघाच्या बाजूने लागेल असा खूप प्रयत्न केला. पण पाऊस आणि हवामानाने आपलं तेच खरं केलं आणि अखेरीस गाबा कसोटी अनिर्णित राहिली. आता गाबा कसोटी ड्रॉ राहिल्यानंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिकेत काय बदल झाला आहे, जाणून घेऊया.**



ऑस्ट्रेलियाने पाचव्या दिवशी झटपट धावा करण्याच्या प्रयत्नात भारताच्या गोलंदाजीवर बाद झाले. टीम इंडिया फलंदाजीला येताच भारतीय टीम फक्त दोन षटकं फलंदाजी करू शकली. यानंतर पावसाला सुरुवात झाली. पाऊस थांबल्यानंतर सामना पुन्हा सुरू होईल, अशी अपेक्षा होती. मात्र मुसळधार पावसामुळे काही वेळाने सामना अनिर्णित घोषित करण्यात आला.भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया तिसरी कसोटी अनिर्णित राहिल्याने दक्षिण आफ्रिकेला सर्वाधिक फायदा झाला आहे. कारण हा संघ अजूनही पहिल्या क्रमांकावर कायम आहे. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत दक्षिण आफ्रिकेचा संघ पहिल्या स्थानावर आहे. त्यांची टक्केवारी सध्या ६३.३३ आहे. सामना अनिर्णित राहिल्यानंतरही ऑस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. ऑस्ट्रेलियाची टक्केवारी सध्या ६०.७१ आहे. तर भारतीय संघाची टक्केवारी ५७.२९ आहे. भारतीय संघ तिसऱ्या क्रमांकावर आहे.अजूनही भारतीय संघ WTC फायनलमध्ये जाण्याची शक्यता आहे. या मालिकेतील उरलेले दोन सामने खूप महत्त्वाचे असतील, कारण भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कोणता संघ अंतिम फेरीसाठी आपले स्थान निश्चित करेल हे त्यावरून ठरेल.तीन संघ विशेषत: अंतिम फेरीसाठी शर्यतीत आहेत. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि भारत. दक्षिण आफ्रिकेचे दोन कसोटी सामने बाकी आहेत. हा संघ मायदेशात पाकिस्तानविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. जर दक्षिण आफ्रिकेने एकही सामना जिंकला तर त्यांचे अंतिम फेरीतील स्थान निश्चित होईल. या मालिकेत टीम इंडियाचे ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन सामने बाकी आहेत. भारताला अंतिम फेरीत स्थान मिळवायचे असेल तर दोन्ही सामने जिंकणं आवश्यक असणार आहे. तर ऑस्ट्रेलियाचे भारताविरुद्ध दोन सामने आहेत. दोन सामने खेळल्यानंतर संघ श्रीलंकेला जाईल आणि तिथे आणखी दोन कसोटी सामने खेळेल. हे दोन सामने ऑस्ट्रेलियासाठी महत्त्वाचे असणार आहेत.गाबा कसोटी सामन्यात पावसामुळे खेळ थांबलेला असताना रवीचंद्रन अश्विनशी बोलताना विराट कोहली भावुक होत अश्विनला मिठी मारताना दिसला. दोघेही बराच वेळ एकमेकांशी चर्चा करत होते. यावरून अश्विन निवृत्ती जाहीर करणार का अशी चर्चा रंगली होती आणि गाबा कसोटी अनिर्णित राहिल्याचे जाहीर होताच पत्रकार परिषदेत अश्विनने निवृत्त होत असल्याचे सांगत सर्वांनाच धक्का दिला. अश्विनच्या निवृत्तीवर विराट कोहलीनेही भावुक होत प्रतिक्रिया दिली आहे.बॉर्डर गावस्कर ट्रॉफी मालिकेतील पिंक बॉल कसोटी सामना अश्विन खेळताना दिसला होता. पण तिसऱ्या कसोटी सामन्यात त्याच्याऐवजी जडेजाला संधी देण्यात आली. मेलबर्न आणि सिडनीमध्ये त्याला प्लेईंग इलेव्हनमध्ये जागा मिळण्याची शक्यता होती. पण तत्पूर्वी त्याने निवृत्ती जाहीर करत सर्वांना धक्का दिला.

### अश्विनच्या निवृत्तीवर विराट भावुक

त्याच्या निवृत्तीवर विराट कोहलीने एक्सवर पोस्ट केली आहे. रविचंद्रन अश्विनच्या निवृत्तीवर बोलताना विराट म्हणाला, “मी १४ वर्षे तुझ्याबरोबर खेळलो आहे आणि तू आज निवृत्त होत आहेस हे मला सांगितलंस, तेव्हा मी थोडा भावूक झालो आणि एकत्र खेळतानाच्या त्या सर्व वर्षांच्या आठवणी चटकन माझ्या डोळ्यासमोर आल्या. तुझ्याबरोबर खेळतानाच्या प्रत्येक क्षणाच्या मी आनंद लुटला आहे अश्विन. भारतीय क्रिकेटमध्ये तुमचे कौशल्य आणि सामना जिंकण्यासाठीचं तुझं योगदान कोणापेक्षाही कमी नाही आणि तू नेहमी भारतीय क्रिकेटचा एक दिग्गज म्हणून ओळखला जाशील. विराट कोहली भावुक होत अश्विनला मिठी मारताना दिसला. दोघेही बराच वेळ एकमेकांशी चर्चा करत होते. यावरून अश्विन निवृत्ती जाहीर करणार का अशी चर्चा रंगली होती आणि गाबा कसोटी अनिर्णित राहिल्याचे जाहीर होताच पत्रकार परिषदेत अश्विनने निवृत्त होत असल्याचे सांगत सर्वांनाच धक्का दिला.

---

# जसप्रीत बुमराहने घडवला इतिहास

## जसप्रीत बुमराह कपिल देवला मागे टाकत ठरला नंबर वन

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेतील तिसरा सामना गाबामध्ये रोमांचक वळणावर आहे. गाबा कसोटीचा पाचवा दिवस असून सामना ड्रॉ होणार की दोन्ही संघांपैकी कोणता संघ बाजी मारणार, हे चित्र अजूनही स्पष्ट झालेलं नाही. या सामन्यात टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची दमदार कामगिरी पाहायला मिळत आहे. बुमराहने पाचव्या दिवशी २ महत्त्वाच्या विकेट मिळवत दुसऱ्या डावाची संघाला चांगली सुरूवात करून दिली.**



जसप्रीत बुमराहने पाचव्या दिवशी मार्नस लबुशेनची विकेट घेत ऑस्ट्रेलियन भूमीवर इतिहास घडवला आहे. आता बुमराहने टीम इंडियाचे माजी दिग्गज कर्णधार कपिल देव यांचा मोठा विक्रम मोडत पहिलं स्थान गाठलं आहे. जसप्रीत बुमराहने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये आतापर्यंत शानदार गोलंदाजी केली आहे. गाबा कसोटीच्या दुसऱ्या डावात बुमराहने मार्नस लबुशेनची दुसरी विकेट घेतली. तर पॅट कमिन्सला बाद करत बुमराहने तिसरी विकेटही मिळवली.बुमराह आता ऑस्ट्रेलियात सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज बनला आहे. यापूर्वी हा विक्रम भारताचे माजी दिग्गज कर्णधार कपिल देव यांच्या नावावर होता. ज्यांनी ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर गोलंदाजी करताना ५१ विकेट घेतले होते. जसप्रीत बुमराहच्या नावावर आता ऑस्ट्रेलियात ५३ विकेट्स आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर भारताचा माजी फिरकीपटू दिग्गज अनिल कुंबळे आहे, ज्याने ऑस्ट्रेलियात ४९ विकेट घेतल्या आहेत.

### जसप्रीत बुमराह- 53 विकेट्स

गाबा कसोटीच्या दुसऱ्या डावात पाचव्या दिवशी टीम इंडियाकडून अप्रतिम गोलंदाजी पाहायला मिळाली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने अवघ्या ३३ धावांत ५ विकेट गमावल्या. ज्यामध्ये जसप्रीत बुमराहने २, आकाश दीपने २ आणि मोहम्मद सिराजने एक विकेट घेतली. यानंतर हेड आणि कॅरीने संघाचा डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला आणि धावांची भर घातली. पण सिराजने हेडला झेलबाद करत सहावी विकेट मिळवली. यासह ऑस्ट्रेलियाने डाव घोषित करत भारताला विजयासाठी २७५ धावांचे आव्हान दिलं आहे.